-१-

क्र.महसुल/क-१/टे.१४/एलबीपी/कावि-११४
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक १७/१२/२००२

सचिव मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, अंबरनाथ यांचा अर्ज दि. ३०/११/९८
उपविभागीय अधिकारी उल्हासनगर विभाग उल्हासनगर यांचेकडील अहवाल क्रं.उपविअ/ महसुल/क-१/टे-१/जया/एसआर-४९/९९ दि. १०/१२/९९
तहसिलदार उल्हासनगर यांचेकडील चौकशी अहवाल क्रं.महसुल/क-१/टे-१/वशी-५११/९९ दि. २५/५/९९
या कार्यालयाकडील प्रस्ताव क्रं.महसुल/क-१/टे-१४/एलबीपी/कावि-७३७ दि. ११/९/२०००
शासनाचे महसुल व वन विभागाकडील ज्ञापन क्रं.जमिन २७२०००/प्र.क्रं.२१४४/ज-४ दि.१६/१०/२००२

ज्याअर्थी श्री. जी. एम. पाटील सचिव, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, अंबरनाथ यांनी मौजे मोरिवली ता. अंबरनाथ येथील डी. डी. स्कीम १५ सि.स.नं. ९१६७ मधील शैक्षणिक प्रयोजनार्थ ८०००-०० चौ.मी. व क्रिडांगणासाठी १२८००-०० चौ.मि. असे एकूण २०८००-०० चौ.मी. जागेची मागणी केली आहे.

व ज्या अर्थी प्रस्तुत जमिन मागणीचे प्रकरणी उपरोक्त उपोद्य अ.क्रं. २ व ३ नुसार तहसिलदार व उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांनी चौकशी अहवालान्वये सदरहु जमिन मंजुर करणेकामी हरकत नसलेचे अभिप्राय दिलेले आहेत.

त्या अर्थी या कार्यालयाकडील उपरोक्त उपोद्यातील अ.क्रं. ४ नुसार शासनाकडे सदरहु जमिन मंजुरीचा प्रस्ताव सादर करणेंत आला आहे.

व ज्या अर्थी शासनाचे महसुल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन २७२०००/प्र.क्र. २१४४/ज-४/दि. १६/१०/२००२ अन्वये मौजे मोरिवली ता. अंबरनाथ येथिल डी.डी. स्किम १५,सि.स.क्र. ९१६७ क्षेत्र ६७३७४-०० चौ.मी. शासकिय जमिनीपैकी ३२८०-०० चौ.मी. जमिन शाळेच्या इमारतीसाठी कब्जेहक्काने, महसुल मुक्त व सारामाफीने तसेच शाळेच्या भुखंडालगतची ६५६०-०० चौ.मी. जमीन क्रिडांगणांसाठी रु. १/- नाममात्र भाडे आकारुन १५ वर्षाच्या कालावधीकरितां भाडेपट्टयाने नियमित अटीं व शर्तीवर मंजूर केली आहे.

त्याअर्थी. शासनाचे महसूल व वन विभागा कडील दि. १६/१०/२००२ चे शासन ज्ञापनानुसार मी, आय्.एस्. चहल, जिल्हाधिकारी ठाणे मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मौजे मोरिवली ता. अंबरनाथ जि. ठाणे येथिल डी.डी. स्किम १५,सि.स.क्र. ९१६७ मधील ६७३७४-०० चौ.मी. शासकिय जमिनीपैकी ३२८०-०० चौ.मी. जमिन शाळेच्या इमारतीसाठी कब्जेहक्कानें, महसुल मुक्त व सारामाफीनें व लगतची ६५६०-०० चौ.मी. जमीन क्रिडांगणासाठी रु. १/- नाममात्र भाडे आकारुन १५ वर्षाचे कालावधीकरिता भाडेपट्टयाने अशी एकूण ९८४०-०० चौ. मी. जमिन मॉडर्न एज्युकेशन सोसायटी अंबरनाथ यांना खालील प्रमाणे नमुद अटी व शर्तीवर मंजुर करणेंत येत आहे.

१७/१२/०२

२/-

३२८०
६५६०
९८४०

-2-

श्था ही जमीन वर्ग-२ भोगवटदार म्हणून धारण करील व शैक्षणिक प्रयोजना व्यतिरिक्त जनासाठी या जमीनीचा वापर करता येणार नाही.

ा प्रयोजनासाठी जमिन देण्यांत आली आहे. केवळ त्याच प्रयोजनासाठी वापर करावा. जनार्थ वापर केल्यास जमीन सरकार जमा करावयास पात्र राहील.

स्था जोपर्यंत शाळा शासकीय अटी व शर्तीनुसार चालवेल तोपर्यंत शासकिय जमीन त्या राहील, संस्थेने शाळा बंद केल्यास शासकिय जमिन शासनाला परत करेल.

ातिगृहिता यांनी विषयांकित ६५६०-०० चौ.मी. जमीन ही भाडेपट्टयाने १५ वर्षे ा धारण करणेची आहे.

ातिगृहिता यांना सदरची जमिन अगर त्याचा भाग गहाण,दान,विक्री, बक्षीसपत्र भाडेपट्टयाने न्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करता येणार नाही.

प्रतिगृहिता यांनी जमिनीचा ताबा घेतल्यापासून जमीन ज्या प्रयोजनासाठी प्रदान करण्यांत आहे. त्या प्रयोजनासाठी सर्व बाबींची परिपुर्तता करुन घेऊन जमिन पुर्णतः उपयोगात पाहिजे.

ागृहीता यांनी महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ नियमानुसार नमुना १५ मध्ये सर्व अटी व शर्ती समाविष्ट करणारा व त्यास मान्यता देणारा ामा करुन देणे यांचेवर बंधनकारक राहील.

मंजुर जागेचा आकार प्रतिवर्षी शासनास भरणा करणे प्रतिगृहितास बंधनकारक राहील.

प्रतिगृहिता यांना ६५६०-०० चौ.मी. जमिन १ रु. नाममात्र इतके भुईभाडयाने १५ वर्षाच्या ट्याने दि.१७/१२/२००२ ते १६ /१२ /२०१७ या कालावधीसाठी देण्यांत आलेली आहे. ो मुदत संपल्यानंतर प्रतिगृहीता यांचेवर पुढील मुदत वाढवून घेण्यांची संपूर्ण जबाबदारी सदर मुदत वाढून न घेतल्यास सदर जमिनीची आवश्यकता नाही असे समजुन भाडेपट्टयाने जमिन त्यांचेकडून काढून घेऊन सरकार जमा करण्यांत येईल व होणा-या कोणत्याही नीस शासन जबाबदार राहणार नाही.

प्रतिगृहितास प्रदान करण्यांत आलेल्या जमिनीची किंवा तीच्या कोणत्याही भागाची कोणत्याही ानिक प्रयोजनासाठी भविष्यकाळात आवश्यकता असल्यास जमिन काढुन घेण्यांस बंधनकारक ल.

। वर नमुद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्ती तसेच महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम ३६ चे उपबंध व त्या अन्वये तयार करण्यांत आलेले नियम व शासन परिपत्रक महसुल व वन ाग क्रं.एलआरएफ/१०८३/७११३/प्र.क्रं.३४७८/जी-६ दि. ८/२/१९८३ च्या परिच्छेद १० व अन्वये लादलेल्या अटी व शर्तीपैकी कोणत्याही अट/शर्तीचे उल्लंघन झाल्यास भाडेपट्टयाने न प्रदान करण्यांत आलेले आदेश रद्द करण्यांत येईल व कोणतीही भरपाई न देता जमिन कार जमा करण्यांत येईल.

) सदरचा आदेश शासनाचे महसुल व वन विभागाकडील ज्ञापन क्रं.जमिन/२७२०००/ क्रं.२१४४/ज-४ दि. १६/१०/२००२ अन्वये मंजुरीस अधिन राहून पारित करण्यांत येत आहे.

3/-

X२५०

morden school--1



१३) शासकिय अधिकारी/कर्मचारी यांचे वदलीगुळे उद्भवलेल्या निकडीमुळे त्यांचे मुलांचे प्रवेशासाठी शाळा प्राधान्य देईल.

सही/-
(आय.एस.चहल)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रतः सचिव, मॉर्डन एज्युकेशन सोसायटी, अंबरनाथ

प्रतः तहसिलदार अंबरनाथ

२/- वरिल आदेशात नमूद केल्याप्रमाणे मौजे मोरीवली ता. अंबरनाथ येथील सि.स.नं. ९१६७ चे स्थान लक्षात घेऊन तहसिलदार अंबरनाथ यांनी संस्थेला जमिनीचा प्रत्यक्ष ताबा देताना जमिनीचा सुयोग्य वापर ही बाब ध्यानात घेऊन सदर सर्व्हे क्रमांकातील उर्वरीत जमिनीचावापर करताना त्यामध्ये गैरसोय / अडचणी निर्माण होणार नाहीत अशा प्रकारे स्थानिक पहाणी करुन जमीन निश्चित करावी व मंजुर क्षेत्राचा ताबा मॉर्डन एज्युकेशन अंबरनाथ या संस्थेस द्यावा व ताबा पावती करुन घ्यावी. तसेच जागेची मोजणी तालुका निरिक्षक भुमी अभिलेख यांचेकडून तात्काळ करुन घेऊन त्यांच्या नकाशाच्या प्रति इकडील कार्यालयास पाठवाव्यात. मोजणी फी अर्जदार संस्थेकडून परस्पर वसुल करणेस तालुका निरिक्षक भुमी अभिलेख यांना कळविणे, तसेच नमुना १५ मध्ये करारनामा तयार करुन घेऊन सदरचा करारनामा स्वाक्षरीसाठी सादर करावा. सदर आदेशानुसार सदर जमिनीची गाव नमुना नं. ७/१२ मध्ये कब्जेदार सदरी तसेच इतर हक्कासदरी भुईभाडयाची भाडेपट्टयाची नोंद ठेवुन जमिनीचा ७/१२ उतारा ताबेपावतीसह सादर करावा.

प्रतः तालुका निरीक्षक भुमी अभिलेख उल्हासनगर

२/- मॉर्डन एज्युकेशन सोसायटी अंबरनाथ यांना प्रदान केलेल्या जागेची तात्काळ मोजणी करुन मोजणी नकाशा तयार करुन पाठवावा. सदर जागेची होणारी मोजणी फी संस्थेकडून परस्पर वसुल करणेंत यावी.

प्रतः- मा. प्रधान सचिव महसुल व वन विभाग(ज-४) मंत्रालय मुंबई ३२ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.-२

प्रतः मा. आयुक्त कोकण विभाग कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

१७/१२/०५

जिल्हाधिकारी ठाणे करिता.